कांनी राष्ट्रीय एकात्मतेची भावना धर्मसमभावाची शिकवण द्यावी. जात जातीय सलोखा,बंधुभाव अन् तावरण प्रस्थापित होईल.
ापारीकरण थांबविण्यासाठी आणि ा मुला-मुलींना उच्च शिक्षणाचा

क्रमप्राप्तच ठरते.कारण या शिक्षणमहर्षींनी देखील शैक्षणिक क्षेत्रात मोलाचं योगदान दिल आहे.दर्जेदार शिक्षण देणारा देश,अशी जगात भारताची प्रतिमा असावी हे डॉ.राधाकृष्णन यांचे स्वप्न साकार करणे,म्हणजे हीच खरी शिक्षण दिन साजरा करण्याची फलश्रुती होय.

# विद्यार्थ्यांना स्टडी ॲपचे वितरण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

शहापूर ग्रामिण : रोटरी क्लब भिवंडी रुरल च्या वतीने पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालय भिवंडी येथे, नागाव व कालवार शाळेतील दहावी च्या सहाशे विद्यार्थ्यांना स्टडी अँपचे वितरण करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या वतीने मार्गदर्शन देखील करण्यात आले व त्यांना पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच यावेळी रोटरी क्लब भिवंडी रुरल चे अध्यक्ष ॲड.मनीष खंडागळे यांनी देखील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा देऊन अभ्यासाचे मार्गदर्शन केले व भविष्यात शाळेचे नाव उज्वल करून नाव लौकिक करा असे आवाहन केले.व त्यासाठी जे काही सहकार्य लागेल त्यासाठी रोटरी क्लब ऑफ भिवंडी रुरल नेहमी तत्पर राहील असे आश्वासन देखील मनीष खंडागळे यांच्या वतीने देण्यात आले आहे

याप्रसंगी डिस्ट्रिक्ट ऑफिसर रो.कीर्ती वडाळकर , ए जी रो जगदिश म्हात्रे , पिडीएस रो प्रकाश म्हात्रे , क्लबचे अध्यक्ष रो ॲड मनिष खंडागळे , सेक्रेटरी रो प्रमोद भोकरे ,रो अविनाश दिगासकर , रो शंकर भोईर , रो संदीप म्हात्रे ,रो संजय गोणगे , रो ॲड संजय पाटील , रो संजय भोईर , रो बिपीन पाटील आदी रोटेरियन तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुधीर घागस सर ,माजी विद्यार्थी प्रवीण गाडे , ज्ञानेश्वर खंडागळे , जयवंत पाटील , जयदीप बजागे , रमेश गोणेवार व विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.